# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय

रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे

फोन नं ०२२-२९४५१००१

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेसनोट क्रमांक :- २०७** **दिनांक :- ३०/०७/२०२१**

## आय.सी.आय.सी.आय. बँक विरार येथील खुनासह जबरी चोरीच्या गुन्हयातील आरोपी अटकेत.

दिनांक २९/०७/२०२१ रोजी सायंकाळी ०८:०० वाजेच्या सुमारास आय.सी.आय.सी.आय. बँक, विरार पु. या ठिकाणी डेप्युटी मॅनेजर श्रीमती योगीता चौधरी व कॅशियर श्रीमती श्रध्दा देवरुखकर हया काम करीत असतांना सदर बँकेत पुर्व मॅनेजर राहिलेला अनिलकुमार राजदेव दुबे हा जबरी चोरी करण्याच्या उद्देशाने धारदार हत्यारानिशी बँकेत आला. त्यावेळी स्ट्रॉंगरुममध्ये काम करीत असलेल्या डेप्युटी मॅनेजर श्रीमती योगीता चौधरी यांना आरोपी अनिलकुमार दुबे याने मेसरुममध्ये बोलाविले व श्रीमती योगीता चौधरी हया मेसरुममध्ये आल्यानंतर आरोपी अनिल दुबे याने श्रीमती चौधरी यांचे गळयावर व इतर ठिकाणी त्याचेकडील धारदार हत्याराने वार करुन गंभीर जखमी करुन ठार केले. सदर वेळी कॅशरुममध्ये असलेल्या कॅशियर श्रीमती श्रध्दा देवरुखकर यांना श्रीमती योगीता चौधरी यांचे ओरडण्याचा आवाज आल्याने त्यांनी लागलीच बँकेतील सायरन वाजवीला व मेसरुमकडे धावत जात असतांना आरोपी अनिल दुबे याने दरवाज्यामध्येच श्रीमती श्रध्दा देवरुखकर यांच्या गळयावर व शरिरावर वार करुन त्यांनादेखील गंभीर जखमी करुन जिवे ठार मारण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी श्रीमती देवरुखकर हया गंभीर जखमी होवून खाली पडल्या असता अनिल दुबे याने स्ट्रॉंग रुममध्ये जावून ठेविदारांचे सोन्याचे दागिने जबरीने चोरुन घेवून जात असतांना सायरनचे आवाजामुळे बँकेबाहेर जमलेल्या नागरिकांनी त्यास अडवून ताब्यात घेतले. त्यावेळी सदर भागात गस्त करीत असलेले पोलीस अंमलदार श्री सुनिल पाटील व युवराज वाघमोडे हे त्या ठिकाणी पोहचले व त्यांनी सदर आरोपीतास शस्त्रासह ताब्यात घेतले. सदर घटनेमध्ये डेप्युटी मॅनेजर श्रीमती योगीता चौधरी यांचा जागीच मृत्यु झालेला असून कॅशियर श्रीमती श्रध्दा देवरुखकर हया गंभीर जखमी झालेल्या असून त्यांचेवर खाजगी रुग्णालयात उपचार चालू आहे.

सदर प्रकरणी बँकेचे मॅनेजर श्री नितीन बबन आंब्रे यांनी दिलेल्या तक्रारीवरुन विरार पोलीस ठाणे येथे गुरनं. ६४८/२०२१ कलम ३९७, ३०२, ३०७ भादंवि. प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्हयात आरोपी अनिलकुमार राजदेव दुबे यास अटक करण्यात आली असून सदर गुन्हयाचा पुढिल तपास चालू आहे.

----oooo----